# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्यलेखापरीक्षक यांचे दालन**

स्व. इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र. २८१९२८२८

**जा.क्र.मनपा/मुलेप/९७/२०२५-२६** **दि.२०/०५/२०२५**

## // परिपत्रक //

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी / कर्मचारी व मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांकडील कर्मचारी / मजुर यांचे वेतन काढणेकरीता HRMS Pay Roll कार्यान्वित करण्यात आलेले आहे. One Click Attendance बाबत जा.क्र.मनपा/आस्था/२३१०/२०२४-२५, दि.२६/१२/२०२४ अन्वये उपायुक्त (मु.) यांचेमार्फत मा. आयुक्त यांच्या मान्येतेने परिपत्रक जारी करण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्यपध्दतीचे तंतोतंत पालन करुन सर्व संबंधित विभागाने वेतन प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तथापि लेखापरीक्षण विभागात प्राप्त प्रस्तावाची पडताळणी केली असता सदर परिपत्रकांचे पालन न करता वेतन प्रस्तावित करीत असल्याबाबतची बाब निर्दशनास आलेली आहे. सबब मा. आयुक्त यांचे महानगरपालिकेचे स्थायी अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन १ तारखेपर्यंत व अस्थायी / मनुष्यबळ पुरवठा ठेकेदाराकडील कर्मचारी / मजुर यांचे वेतन १० तारखेपर्यंत अदा करण्यात यावे या निर्देशाची अंमलबजावणी करणे अडचणीचे ठरत आहे.

सर्वसाधारणपणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन पडताळणीकामी वेतन अदा करावयाच्या तारखेपुर्वी एक दिवस अगोदर लेखापरीक्षण विभागात प्राप्त होत असल्याने प्रत्येक कर्मचाऱ्यांचे वेतन One Click Attendance नुसार काढण्यात आले आहे किंवा नाही, तीन पेक्षा अधिक वेळा उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची किरकोळ / अर्जित रजा कपात करण्यात आलेल्या आहेत किंवा नाही, अनियमित बायोमॅट्रीक हजेरी मशिनमध्ये तांत्रिक समस्येमुळे विभागप्रमुखांचे प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले आहे किंवा नाही याबाबत प्रत्येक स्थायी अधिकारी / कर्मचारी तसेच ठेका कर्मचारी / मजुर यांचे वेतन विहित मुदतीत पडताळणी करणे लेखापरीक्षण विभागास शक्य होत नाही. तसेच यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता असल्यास प्रस्ताव संबंधित विभागास परत वर्ग केल्यास विहित वेळेत स्थायी अधिकारी / कर्मचारी व अस्थायी / ठेक्यावरील कर्मचाऱ्यांचे वेतन मंजूर करणे अडचणीचे व कालापव्ययाचे ठरत आहे.

सबब स्थायी / अस्थायी अधिकारी / कर्मचाऱ्यांचे वेतन प्रस्तावित करीत असलेला आस्थापना विभाग तसेच मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांचे वेतन सादर करणाऱ्या संबंधित विभागांनी सक्षम प्राधिकारी यांच्या स्वाक्षरीनिशी जा.क्र.मनपा/आस्था/२३१०/२०२४-२५, दि.२६/१२२०२४ च्या परिपत्रकातील कार्यपध्दतीचा अवलंब करुन One Click Attendance नुसार च्या उपस्थितीनुसार / उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या तीनपेक्षा अधिक वेळा उशिरा उपस्थितीसाठी किरकोळ / अर्जित रजा कपात करण्यात आलेल्या आहेत याबाबतचे प्रमाणपत्र सादर करुन वेतन प्रस्ताव देयक सर्व संबंधितांनी सादर करण्यात यावेत. सदर प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय वेतन प्रस्तावाचे देयक मंजुर करण्यात येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

याबाबत कोणत्याही प्रकारची अनियमितता, कार्यालयात उपस्थित नसताना वेतन अदा केल्याबाबतच्या तक्रारीकरीता सर्व संबंधित विभागप्रमुख जबाबदार असेल याची स्पष्ट नोंद घेण्यात यावी.

Nakadi

**(सुधीर नाकाडी)**
**मुख्य लेखापरीक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

**सर्व उपायुक्त / सर्व विभागप्रमुख / खातेप्रमुख**

**प्रत माहितीसाठी**

1) **मा. आयुक्त**
2) **मा. अतिरीक्त आयुक्त 1 व 2**